# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २६१ वा शुक्रवार दि.२२ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# शिव्याशाप देऊ नका

मुंबई : लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. ज्यामुळे आता सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्यांकडून पदाधिकारी, नेतेमंडळी आणि प्रवक्त्यांच्या बैठका घेण्यात येत आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (ता. २१ मार्च) वरळी डोम येथे पदाधिकारी, प्रवक्ते आणि पक्षातील प्रमुख नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी उपस्थित असलेल्या पदाधिका-यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. विरोधकांवर टीका करा, पण टीका करताना खालच्या पातळीवर जाऊन टीका करू नका, अशी सूचना मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आली आहे.आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला पक्षातील प्रवक्ते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नेते उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एका ठिकाणच्या आरोप- प्रत्यारोपांचे पडसाद सर्वत्र उमटतात. पक्षाची जी भूमिका आहे त्याच्या विरोधात कुणालाही जाता येणार नाही. आपण मराठा आरक्षण दिले आहे. कोर्टात टिकणारे आरक्षण आहे. पोलिस भरती या आरक्षणानुसार होत आहे. मराठा समाजाला न्याय दिला. ओबीसींवर अन्याय केला नाही. ही सर्व कामे लोकांपर्यंत पोहोचवा.तसेच, विरोधक खालच्या पातळीवर टीका करत आहेत. पण आपण आपली पातळी सोडायची नाही. शिव्याशाप द्यायचे नाहीत. विरोधकांना एक्स्पोज करा. हिंदुत्व सोडले, बाळासाहेबांचे विचार



सोडले. शिवाजी पार्कला हिंदू बांधव-भगिनी म्हणायची त्यांना लाज वाटली. २०१९ सालापासून ते बाळासाहेबांच्या इच्छेविरुध्द वागत आहेत, हे सांगा. पण तुम्ही खालच्या पातळीवर विरोधकांवर टीका करू नका. त्यांचा खरा चेहरा समोर आणा, सरकारने केलेली कामे मुद्देसूद मांडा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून करण्यात आल्या आहेत.त्याशिवाय, निवडणुकीकरिता मध्यवर्ती कार्यालयात २४ तास कार्यरत राहणे, प्रत्येक विधानसभा क्षेत्रात कार्यालय कार्यान्वित करून कामाला सुरुवात करणे, विधानसभानिहाय बैठका घेणे, शाखा-शाखांशी संपर्क ठेवावा, महायुतीच्या स्थानिक नेतृत्वाशी संपर्क व समन्वयक ठेवावा. त्यांच्या बैठका घ्याव्यात. संयुक्त मेळावे घ्यावेत, संयुक्त प्रचार करावा, चौक सभा, संयुक्तपणे घरोघरी प्रचार करणे, यांसारख्या सूचना लोकसभा निरीक्षकांना करण्यात आल्या आहेत.प्रत्येक वोटिंग स्लिप वाटण्यात याव्या. मोठ्या सभा, रॅली यासाठी समन्वयाने काम करावे. प्रचार साहित्यावर प्रोटोकॉलनुसार स्थानिक पदाधिका-यांची नावे, फोटो याचा वापर करावा. प्रचार आणि सभांच्या संपूर्ण नियोजनावर लक्ष ठेवावे. महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर्स, पोस्टर, होर्डिंग यासाठी परवानगी घेऊनच लावावे.

## भाजपाचे शृंगारे यांना लातूर ग्रामीण विधानसभेतून साठ हजाराचे मताधिक्यासाठी प्रयत्न करावेत

लातूर :- लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर साठ हजाराहून अधिक मताधिक्य मिळावे यासाठी भाजपाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीं यांनी जिद्दीने प्रयत्न करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे सुपर वॉरियर्स, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्याची बैठक गुरुवार २१ मार्च रोजी भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, पंचायत राज आघाडीचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापूर तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, जिल्हा उपाध्यक्ष हनुमंतबापू नागटिळक, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.


आजपर्यंत भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रदेश भाजपा पक्षाचे सर्व कार्यक्रम प्रभावीपणे राबवून यशस्वी केले. येणारा काळ निवडणुकीचा असून खा. सुधाकर शृंगारे यांनी गेल्या पाच वर्षात निस्वार्थ भावनेतून केलेल्या कामाची दखल घेऊन केंद्रीय पक्षश्रेष्ठींनी पुन्हा उमेदवारी दिली आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी अनेक गोरगरिब जनतेच्या हिताच्या योजना सुरू केल्या गरजू लाभार्थ्यांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिला. अनेक ऐतिहासिक निर्णय घेऊन वर्षानुवर्ष आडगळीत पडलेले प्रश्न निकाली काढले. देशाच्या सर्वांगीण प्रगतीची अनेक कामे होत असल्याने देश विकासाच्या कामात उंचीवर पोहोचला आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयांचा निधी विविध योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याने केलेल्या विकास कामाच्या आधारावर खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण मधून किमान सात हजाराहून अधिक मताधिक्य मिळावे याकरिता भाजपाच्या प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून जिद्दीने जोमाने काम करावे असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी केले.

प्रारंभी मतदार संघातील पक्ष कार्याचा आढावा घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या. नवनाथ भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रारंभी दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले या बैठकीस मतदार संघातील भाजपचे सुपर वॉरियर्स लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीत हस्तक्षेप करणार नाही

नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना एका निवडणूक आयुक्तांनी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली होती. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील समितीने तातडीची बैठक घेऊन दोन नव्या निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली होती. दरम्यान, या नव्या निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीला स्थगिती देण्याची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. या संदर्भातील याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने दोन नव्या निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीला स्थगिती देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच आम्ही या प्रकरणात हस्तक्षेप करणार नाही, कारण असे केल्यास अंधाधुंदी निर्माण होईल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.फेब्रुवारी महिन्यात निवडणूक आयुक्त अनूपचंद्र पांडे हे निवृत्त झाले होते. तर निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी ८ मार्च रोजी अचानक राजीनामा दिला होता. त्यामुळे खळबळ उडाली होती. त्यानंतर सरकारने तातडीने पावले उचलली होती. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील समितीची बैठक होऊन ज्ञानेश कुमार आणि सुखबीर संधू यांची निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली होती. दरम्यान, या नियुक्तीला आव्हान देणा-या याचिकेवर सुनावणी करताना या दोन्ही निवडणूक आयुक्तांविरोधात कुठलेही आरोप नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यानंतर या प्रकरणात आम्ही हस्तक्षेप करणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. निवडणुका तोंडावर आहेत. अशा परिस्थितीत आम्ही हस्तक्षेप केला, तर अंदाधुंदी निर्माण होऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.



पूर्वी उचलले होते प्रश्नचिन्ह मात्र याचिका फेटाळून लावण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. केवळ दोन तासांमध्ये २०० लोकांची छाननी कशी काय झाली, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने सरकारला विचारला होता. विरोधी पक्ष नेत्यांना आणखी वेळ दिला गेला पाहिजे होता का, असा प्रश्न न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी एसजींना विचारले. २०० नावांची छाननी करण्यासाठी केवळ दोन तास दिले गेले, पारदर्शकता केवळ अजून चालत नाही तर ती दाखवली गेली पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाने सुनावले होते.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा वाढदिवस विविध सामाजिक,धार्मिक उपक्रमांनी साजरा









लातुर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा वाढदिवस गुरुवार दिनांक २१ मार्च २०२४ रोजी लातूर शहरासह जिल्हाभरात विविध सामाजिक,धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिर याठिकाणी अभिषेक करण्यात आला. तसेच शहरातील गावभागात असलेल्या सुरत शहावली दर्गा येथे चादर अर्पण करण्यात आली तर लातुर शहरातील विशाल नगरमधील साईबाबा मंदिर या ठिकाणी धर्मवीर औदुंबर पाटील बट्टेवार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दुग्धाअभिषेक करण्यात आला. रेणापूर शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रेणापूर येथील ग्रामदैवत माता रेणुका देवी मंदिरात सकाळी महाआरती व शहरातील महेबुब सुभानी दर्गा येथे चादर अर्पण करण्यात आली.लातुर शहर जिल्हा काँग्रेस सेवादलाच्या वतीने सलग पाचव्या वर्षी शहरातील बार्शी रोड भागात असलेल्या माऊली रक्तपेढी या ठिकाणी रक्तदान शिबीर पार पडले ज्याला रक्तदात्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव,गोरोबा लोखंडे,विजयकुमार साबदे, संभाजी सूळ,दगडुसाहेब पडिले,दगडुअप्पा मिटकरी,ड.देविदास बोरूळे पाटील,प्रा. प्रवीण कांबळे,जालिंदर बर्डे,सुपर्ण जगताप,ड.सचिन पंचाक्षरी,शिवाजी कांबळे,ड.अंगदराव गायकवाड, संजय सूर्यवंशी,युनूस मोमीन,आयुब मणियार, दत्ताभाऊ सोमवंशी,तबरेज ताबोळी,सुंदर पाटील कव्हेकर,धनंजय शेळके,अविनाश बट्टेवार, भाऊसाहेब भडिकर,अभिजित इगे, बालाजी झिपरे,विष्णुदास धायगुडे,अभिषेक पतंगे,महेश कोळे,सुलेखाताई कारेपूरकर,अक्षय मुरुळे,जयदेव मोहिते,पिराजी साठे,बब्रुवान गायकवाड ,प्रमोद जोशी, राजू गवळी,संजय सुरवसे,किरण बनसोडे,अशोक सूर्यवंशी,करीम तांबोळी,निजामुद्दीन शेख,धनंजय गायकवाड,अमोल गायकवाड,आकाश मगर, धर्मवीर औदुंबर पाटील बट्टेवार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अविनाश बट्टेवार.प्रा.प्रविण कांबळे,सुपर्ण जगताप,शिवाजी कांबळे,ज्ञानोबा साखरे,सुरेश चव्हाण,किरण बनसोडे,संजय सुरवसे,गौतम मुळे,नागेश महाराज, रेणापूर काँग्रेस तालुका अध्यक्ष ड. प्रमोद जाधव रेणापूर शहराध्यक्ष मतीन अली सय्यद,सभापती उमाकांत खलंग्रे,उपसभापती शेषेराव हाके,हणमंत पवार,बाजार समिती संचालक जनार्दन माने,बाळकृष्ण खटाळ,विश्वनाथ कागले,सौ.पुजा इगे,स्वाती सोमाणी,निर्मलाताई गायकवाड,राजाभाऊ सांळुके, अल्पसंख्यांक शहरअध्यक्ष पाशाभाई शेख,खमरूद्दीन शेख,अकबर खुरेशी,नय्युम आत्तर,सय्यद मुजफ्फर,गौस फरीद,आयुब शेख,पदम पाटील,अनिल पवार,रामलिंग जोगदंड,ॲड.प्रशांत अकनगिरे,सचिन पुंडलिकराव इगे,उमेश सोमाणी,अजय चक्रे,विजयकुमार एकुरके,मुकेश राजे,हकीमभाईसय्यद,राजभाऊशिंदे,दिपक पाटील,दिनेश पाटील, रंगनाथ इरले,अतुल गोकुळे,प्रदिप काळे,शहाजी कुरे,प्रा.सिदार्थ चव्हाण,संभाजी सुळ,प्रवीण पाटील, शिवाजी कांबळे,नितीन पाटील हरवाडीकर,ॲड.सुनील गायकवाड, राहुल लोंढे, मूनव्वर शेख, प्रा.शिवाजी मोहाळे,राहुल देशमुख,दीपक गायकवाड, रहीम शेख,कैलास माने यांच्यासह लातुर शहर व लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# निष्काम कर्मयोगी

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री आणि मनोहरलालजी खट्टर यांना आपला शिरसाष्टांग दंडवत. नऊ वर्षे हरियाणासारख्या संपन्न राज्याच्या मुख्यमंत्रिपदी आपण राहिलात. खरे तर किती कोटी प्रचंड माया गोळा करायला हवी होती; पण ते काही न करता आपण ते पद सोडले. मान्य आहे की, पक्षाने आदेश दिला म्हटल्याबरोबर क्षणाचाही विचार न करता आपण त्या पदाचा त्याग केलात आणि सामान्य माणसासारखे वागायला सुरुवात केली. आपण ब्रह्मचारी आहात आणि साहजिकच कुटुंबकबिला आपल्या पाठीशी नाही. अहो, इतर राजकारणी लोकांकडे पाहा. आमदारकीची किंवा खासदारकीची एक टर्म मिळाली तरी पुढच्या तीन पिढ्या बसून खातील एवढी कमाई करून ठेवली जाते आणि शिवाय मुलाबाळांना, मुलींना, जावयांना जागेवर आणण्यासाठी आटापिटा केला जातो.हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदावरून उतरल्याबरोबर तुम्ही सगळी संपत्ती देशाला दान करून टाकली. स्वतःची आहे नाही ती सगळी संपत्ती तुम्ही पंतप्रधान सहायता निधीला देऊन टाकलीत, हे पण समजण्यासारखे होते; पण तुमचे स्वतः चे राहते घरसुद्धा तुम्ही एका ग्रंथालयाला दान करून टाकले आणि दोन पिशव्यांमध्ये आपले कपडे आणि सामान भरून बस स्टँडच्या दिशेने रवाना झालात. यामुळे सगळा देश थक्क झाला आहे. साध्या शर्ट-पायजाम्यात, हातात पिशव्या घेतलेला, नऊ वर्षे माजी मुख्यमंत्री राहिलेला गृहस्थ बसने प्रवास करतो, हे हरियाणातील लोकांनी 'याचि देही याचि डोळा' पाहिले.अहो, राजकीय नेता म्हणजे कोटी-दोन कोटींच्या गाड्या पाहिजेत, मागे-पुढे फिरणारे पाच-पन्नास लोक पाहिजेत. किंबहुना नेता निघाल्याबरोबर त्याच्या पाठीशी पाच पंचवीस गाड्यांचा ताफा पाहिजे, तर कुठे आम्हाला तो नेता आहे असे वाटते. असे काही न करता तुम्ही आहे ते देशाला देऊन टाकलेत, हे कौतुकास्पद आहे. असे उदाहरण तुम्ही दाखवून द्याल तर मग बाकी लोकांनी काय करायचे? आपल्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत कुठला घोटाळा स्वतः केला नाही आणि दुसर्यांना करू दिला नाही. स्वच्छ प्रशासन ठेवून तुम्ही काम केलेत. आता पक्ष तुम्हाला लोकसभेची उमेदवारी देणार आहे म्हणे. अहो खट्टरसाहेब, किमान ती लढवण्यासाठी तर पैसे लागतील ना? तेवढे तरी ठेवून घ्यायचे होते ना? सर्वसंग परित्याग करून, सर्व संपत्ती दान करून निष्काम कर्मयोगी होणारे उदाहरण तुमच्या रूपाने कित्येक वर्षांनंतर या देशामध्ये पाहायला मिळाले.उभे राहिलात तर तुम्हाला संपत्तीच्या रकान्यामध्ये निरंक लिहावे लागेल, अशी शक्यता दिसत आहे. आज निवडणूक लढविणार्या प्रत्येक उमेदवाराला आपली संपत्ती जाहीर करणे आवश्यक असते. सर्वात कमी संपत्ती असणारासुद्धा पन्नास एक कोटी रुपये बाळगून असतो आणि सर्वात जास्त संपत्ती असणारा दोन एक हजार कोटी रुपये बाळगून असतो. अशा वेळेला शून्य संपत्ती बाळगणारा तुमच्यासारखा उमेदवार लोकसभेला निवडून तरी कसा येणार, याची आम्हाला काळजी लागली आहे. कसे वागावे, याचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे; पण प्रचलित राजकारणाला सोडून वेगळे वागला. सत्ता केवळ जनतेच्या सेवेसाठी वापरायची आणि त्यातून स्वतःचे काही भले साधायचे नाही, असे एकमेव दुर्मीळ उदाहरण म्हणून तुम्ही आमच्या मनामध्ये कायमस्वरूपी असाल, हे निश्चित आहे.

# आपल्या बोलीतून शिकता यावे म्हणून..

धर्मेंद्र प्रधान,केंद्रीय शिक्षण आणि ,कौशल्यविकास व उद्योजकतामंत्री शिक्षण हे चारित्र्याचा विकास आणि राष्ट्रबांधणीचे उदात्त कार्य आहे. आपले राष्ट्रीय शिक्षण धोरण हाच सर्वांगीण उद्देश ठेवून तयार करण्यात आले आहे. त्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना सर्व अध्ययन साहित्य त्यांच्या मातृभाषांमध्ये उपलब्ध व्हावे यासाठी १७ राज्यांतील ५२ स्थानिक भाषांत प्राथमिक पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत.'लिडार' कितपत प्रभावी? गावठाण, सिडको वसाहतींमधील बांधकामांना पूर्वीप्रमाणेच कर आकारणी प्राचीन काळापासून भारत आपल्या सांस्कृतिक वैविध्यासाठी प्रसिद्ध आहे. भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये अनेक भाषांचा विकास बोली आणि लेखी अशा दोन्ही स्वरूपांत झाला. राष्ट्राच्या समृद्ध भाषक पटाचे हे प्रतीक आहे. हे बहुभाषिक चैतन्य भारताच्या ठळक वैशिष्ट्यांपैकी एक आहे. आंतरसंवादासाठी अत्यावश्यक असलेल्या भाषा व बोलींचे भंडार त्यामुळे जोपासले जाते. पायाभूत भाषिक वैविध्य असले तरी ते एकात्मीकरणाला बळ देते, राष्ट्राला एकत्र बांधून ठेवते. शिवाय, देशभरात ज्ञानाचा प्रसार करण्यामध्ये हे बहुभाषिक अंग खूपच उपयुक्त ठरत आहे.भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीमध्ये देशाच्या बहुभाषिकतेने निभावलेली भूमिका, अलीकडेच अमलात आणल्या गेलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२०मध्ये, अधोरेखित करण्यात आली आहे. राष्ट्राच्या विकासासाठी भाषिक वैविध्याचा उपयोग करण्यावर भर देणाऱ्या या धोरणात सर्व शैक्षणिक स्तरांवर बहुभाषिकतेचा प्रसार करण्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत शिकण्याच्या पुरेशा संधी दिल्या जातील आणि शैक्षणिक साहित्य सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असेल हे यात अध्याहृत आहे. असे उपक्रम केवळ बहुभाषिकतेच्या वैशिष्ट्याला अधिक समृद्ध करत नाहीत, तर 'विकसित भारता'चे उद्दिष्ट साध्य करण्यामध्येही मोठे योगदान देतात.विद्यार्थ्यांना सर्व अध्ययन साहित्य त्यांच्या मातृभाषांमध्ये उपलब्ध होईल, आपल्या स्थानिक भाषांमध्ये शैक्षणिक प्रवास सुरू करण्याची संधी त्यांच्या आवाक्यात येईल या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने एक लक्षणीय उपक्रम हाती घेतला आहे. हे सुलभ करण्यासाठी ५२ प्राथमिक स्तरावरील पुस्तके स्थानिक भाषांमध्ये तयार करण्यात आली आहेत, जेणेकरून, लहान मुले त्यांच्या पायाभूत भाषिक कौशल्यांच्या आधारे सहजगत्या औपचारिक शिक्षण घेऊ शकतील. ही प्राथमिक पुस्तके अर्थात 'प्रायमर्स' पाठ्यपुस्तकांच्या व वाचन साहित्याच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यांचे उद्दिष्ट भाषिक कौशल्यांची जोपासना हे तर आहेच, शिवाय, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि चिकित्सक विचाराला चालना देणे, हे उद्दिष्टही या प्रायासामागे आहे.शिक्षण मंत्रालयाच्या प्रोत्साहनाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) १७ राज्यांतील ५२ स्थानिक भाषांतील प्रायमर्सच्या निर्मितीप्रक्रियेचे नेतृत्व केले आहे. दखलपात्र बाब म्हणजे भाषांची निवड प्रादेशिक बोलीभाषांपुरती मर्यादित नाही, त्यामध्ये आदिवासी समुदायांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलींचाही समावेश आहे. त्यामुळे सीमांत समूहांमध्ये समावेशकता व विकासाला चालना मिळणार आहे. विविध भाषांमध्ये वाचनाला प्रोत्साहन देऊन मुलांची विषयांमध्ये रमण्याची तसेच तो समजून घेण्याची क्षमता वाढवणे अपेक्षित आहे.हा सरकारी उपक्रम रूपांतरणात्मक ठरेल, असे वाटते.

मुलांचे ज्ञान तर यामुळे समृद्ध होईलच, शिवाय, त्यांच्या सर्वांगीण विकासालाही हातभार लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'गॅरंटी ऑफ विकसित भारत२०४७' हे वचन साध्य करण्यातील हा महत्त्वाचा टप्पा आहे. आपल्या राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी हा उपक्रम दमदार पायाभरणी करून देणार आहे. ही प्रायमर्स खूपच लाभदायी ठरणार आहेत. विशेषत: लहान मुलांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात विविध भाषांचा वापर यामुळे करता येणार आहे. प्रायमर्सचा वापर एका महत्त्वपूर्ण साधनेसारखा करून त्यांच्यातील विविध भाषांमधील मुळाक्षरे उच्चारण्याची, ओळखण्याची व समजून घेण्याची क्षमता वाढू शकते. शिवाय, या मुळाक्षरांच्या विविध संगतींमधून तयार झालेल्या वाक्यांच्या अर्थाशीही प्रायमर्स लहान मुलांचा परिचय करून देतील.साधारणपणे मुलाचे सुरुवातीचे शिक्षण त्याच्या/तिच्या स्थानिक भाषेत होते. मात्र, औपचारिक शाळेत प्रवेश केल्यानंतर त्यांना त्यांच्या प्रादेशिक भाषेत किंवा त्यांच्या राज्यात प्रचलित असलेल्या भाषेत शिकावे लागते. त्यामुळे सुरुवातीलाच काही आव्हाने निर्माण होतात. शाळेतही सुरुवातीपासून मुलांना मातृभाषेत शिक्षण घेण्याची संधी देण्याचा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. त्यामुळे विषयाचा पाया समजून घेण्याची प्रक्रिया अधिक सुधारेल, अशी सूचना त्यांनी केली आहे. ही प्रायमर्स लहान मुलांच्या, शिक्षणात मोलाची मदत करतील असे अपेक्षित आहे. भारतीय भाषांतील या ५२ प्रायमर्समुळे लहान वयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात रूपांतरणात्मक बदल घडून येणार आहे. विशेषत: सुरुवातीच्या काही वर्षांत तर त्यांना ही खूपच उपयुक्त ठरणार आहेत. मातृभाषा व स्थानिक भाषेतून शिक्षण सुलभ झाल्यास समृद्ध शैक्षणिक प्रवासाचा पाया रचला जातो, सखोल समजुतीची जोपासना होते आणि आयुष्यभर पुरतील अशी अध्ययन कौशल्ये विकसित होतात. शिवाय, या भाषा एतद्देशीय संस्कृतीची प्रवेशद्वारे असतात, त्यामुळे लहान मुलांना आपला वारसा समजून घेणे सोपे होते. प्रत्येक राज्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रायमर्स विकसित करण्यात आली आहेत, त्यामध्ये विविध बोली आणि भाषांचा समावेश आहे. ओडिशामध्ये गदाबा, जुआंग, कुई, किसान, संथाली-ओडिया आणि सौरा अशा सहा भाषा किंवा बोलींची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आसामसाठी तयार करण्यात आलेली प्रायमर्स आसामी, बोडो, देओरी, दिमासा, ह्मार, कार्बी, मिसिंग व तिवा अशा आठ भाषांमध्ये आहेत. मणिपूरची प्रायमर्सही सहा भाषांमध्ये आहेत. अनाल, काबुई (रोंगमाई), लिआंगमाई, मणिपुरी, माओ व तांगखुल या त्या सहा भाषा आहेत. नागालँडच्या प्रायमर्समध्ये अंगामी, अओ, खेझा, लोथा व सुमी या भाषांचा समावेश आहे. सिक्किममध्ये सात भाषांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. भुतिया, लेपचा, लिंबु, नेपाळी, राई, शेर्पा व तमांग या त्या सात भाषा आहेत. आंध्र प्रदेशातील प्रायमर्स जतापा, कोंडा आणि कोया भाषांत आहेत, तर अरुणाचल प्रदेशाची प्रायमर्स मिश्मी, नायिशी, तांग्सा आणि वांचो या भाषांत आहेत. झारखंडमधील प्रायमर्स खरिया, कुरुख आणि मुंदारी भाषेत आहेत, तर कर्नाटकातील प्रायमर्स कोडावा आणि तुळू भाषेत आहेत. छत्तीसगढमधील प्रायमर्स हलबी भाषेत आहेत. हिमाचल प्रदेशातील प्रायमर्स



किनौरी, तर मध्य प्रदेशातील कोकु भाषेत आहेत. महाराष्ट्रातील प्रायमर्स खान्देशी भाषेत आहेत. मेघालयातील गारो भाषेत, तर मिझोरममधील मिझोमध्ये आहेत. त्रिपुरामधील प्रायमर मोग भाषेत आहेत. पश्चिम बंगालसाठी संथाली-बंगाली भाषेत प्रायमर्स तयार करण्यात आली आहेत.शिक्षण म्हणजे केवळ पदव्या प्राप्त करणे किंवा अध्ययनविषयक पाठपुरावा नव्हे; शिक्षण म्हणजे चारित्र्याचा विकास आणि राष्ट्रबांधणीचे उदात्त कार्य आहे. आपले राष्ट्रीय शिक्षण धोरण हाच सर्वांगीण उद्देश ठेवून तयार करण्यात आले आहे. आजघडीला देशभरातील सुमारे १७ कोटी मुलांना सामाजिक, आर्थिक व भाषिक कारणांमुळे पारंपरिक शालेय व्यवस्थेत अडचणी जाणवत आहेत. वंचित मुलांच्या गरजांनुसार तयार केलेल्या उपायांच्या माध्यमातून या अडचणींवर मात करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण प्रयत्नशील आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्यात येणारे भाषाविषयक अडथळे दूर करण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. यात प्रायमर्सच्या विकासाचाही समावेश आहे. मुलांना शिक्षण व ज्ञान दोन्ही प्राप्त करून देणाऱ्या साधनांनी सुसज्ज करणे हेच या प्रयत्नांमागील उद्दिष्ट आहे. शिवाय, सरकारने 'प्रिय सुगम्यता' नावाचे एक ई-कॉमिक बुकलेटही आणले आहे. दृष्टी, भाषा किंवा ऐकण्यात समस्या असलेल्या मुलांसाठी हे उपयुक्त आहे. हे नवोन्मेषकारी संसाधन या मुलांसाठी खूपच लाभदायी ठरले असून शिक्षणातील समावेशकतेची दक्षताही ते घेते.सरकार धोरणे आखत असले तरी त्याचा खरा प्रभाव हा तळागाळात होणाऱ्या परिणामकारक अंमलबजावणीवर अवलंबून असतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण स्वीकारणे ही तर केवळ सुरुवात आहे; त्याच्या संपूर्ण सर्वसमावेशक कार्यान्वयनासाठी सरकार वचनबद्ध आहे. हे धोरण पूर्णपणे अमलात आणणे हे प्रथम उद्दिष्ट आहे, आम्ही १०० टक्के अंमलबजावणी करणार आहोत. लहान मुलांमध्ये पायाभूत साक्षरतेला प्राधान्य देतानाच 'विकसित भारता'साठी सशक्त व प्रबुद्ध पिढी जोपासण्याची महत्त्वाकांक्षा ठेवण्यात आली आहे.

# युवाशक्तीचे खच्चीकरण!

केंद्रीय निवडणूक आयोगाने देशात लोकसभा निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. निवडणुका जाहीर होताच संपूर्ण देशात आचारसंहिता लागू झाली. देशभरात ७ टप्प्यांत मतदान होणार असून ४ जूनला निकाल जाहीर होणार आहे. देशात ९६.८ कोटींहून अधिक मतदार आहेत. देशात १० लाख ५० हजार मतदान केंद्रे असून सुमारे ५५ लाखांपेक्षा अधिक ईव्हीएम मशिन्स निवडणुकीच्या कामासाठी वापरली जाणार आहेत. निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १.५ कोटी कर्मचारी झटणार आहेत. देशभरात ४९.७ कोटी पुरुष तर ४७.१ कोटी महिला मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात १८ ते २१ वयोगटातील २१.५० कोटी मतदार आहेत. जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश, जगातील सर्वाधिक युवकांची संख्या असलेला देश असे गोडवे उच्चरवाने गाण्यास सुरुवात होते. निवडणुका म्हटल्या की, रणधुमाळी आलीच. ही रणधुमाळी तिकिटवाटप अथवा जागावाटपासाठी असते. विविध राजकीय पक्षांमध्ये खात्रीचे मतदारसंघ मिळविण्यासाठी आणि



परंपरागत आपले बालेकिल्ले टिकविण्यासाठी चढाओढ सुरू असते. हा प्रकार देशभरात सुरू असतो. मात्र त्याला स्पर्धा म्हणता येणार नाही. कारण सत्तेचा किंवा वाटेल त्या मार्गाने सत्ता काबीज करण्याचा दर्प तिथे असल्याने त्याला डावपेच अथवा शह-काटशह म्हणणेच योग्य ठरेल. इतकेच नव्हे तर आपल्या प्रतिस्पर्ध्याचे तिकिट कसे कापले जाईल यासाठी वेगवेगळी षड्यंत्रे, कारस्थाने केली जातात. या सा-या प्रकाराला राजकारण म्हटले जाते. वरकरणी राजकारणातले मतभेद म्हणून एकूण प्रकाराकडे दुर्लक्ष केले तरी त्यातली राजकीय वैरभावना कमी होण्याची शक्यता नसते. लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येणा-यांचे कोडकौतुक केले जाते परंतु निवडून येणा-यांची संख्या किंवा समाजातल्या विशिष्ट घटकांतलेच लोकप्रतिनिधी जेव्हा वारंवार निवडून येतात तेव्हा हा प्रकार बघितल्यानंतर देशातल्या तरुणाईचे काय, असा प्रश्न निर्माण होतो. विशिष्ट मतदारसंघांत वर्षानुवर्षे तेच लोकप्रतिनिधी बघितल्यानंतर त्या मतदारसंघात अन्य कोणी पात्र उमेदवारच नाही काय, असे वाटू लागते. आपलेच नेतृत्व कसे योग्य आहे,आपल्या घरातलेच लोक या मतदारसंघासाठी वारसदार आहेत, असे बिंबविण्याचा जेव्हा प्रयत्न होतो तेव्हा जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश, सर्वांत मोठ्या तरुणाईचा देश अशी स्वत:ची पाठ थोपटून घ्यायची ती तरी कशासाठी? सर्वाधिक युवकांची संख्या असलेल्या या देशात युवक आणि महिला घटक सर्वाधिक दुर्लक्षित आहेत. अनेक तरुण आणि महिलांकडे निवडणूक लढविण्याची आणि जिद्द, पात्रता असूनही त्यांना संधी मिळत नाही किंबहुना ती मिळू दिली जात नाही हेच खरे! आतापर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकांवर नजर टाकल्यास हे कटू सत्य लक्षात येईल. आतापर्यंत पार पडलेल्या १७ लोकसभा निवडणुकांत ४० पेक्षा कमी वय असलेल्या तरुण खासदारांची संख्या ६ टक्के होती. चाळीसपेक्षा जास्त वय असलेल्या खासदारांची संख्या जवळपास ९० टक्के होती, असे होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षाने कधीही आपल्या उमेदवारांच्या यादीत तरुणांना स्थान दिले नाही. सलग पाच वेळा निवडणूक लढविणारे १७ खासदार आहेत तर तीन वेळा निवडणूक लढविणा-यांची संख्या ५७ आहे म्हणे. वयोगटाचा विचार केल्यास १७ व्या लोकसभेतसुद्धा ४० वयोगट असलेल्यांची संख्या केवळ ३६ आहे. साठ ते सत्तर वयोगटातील खासदारांची संख्या ३०२ आहे.साधारणपणे वयाची ६० वर्षे पूर्ण झाली की अनेक क्षेत्रांतून माणूस निवृत्त होतो. केवळ वय वाढले म्हणून निवृत्त होणे हे गृहीत असतेच पण दुस-यांना किंवा तरुणांना संधी मिळावी, येणा-या पिढीकडे आपल्या हाती असलेला कारभार सोपवावा हाही त्यामागे उद्देश असतो. मजेची गोष्ट म्हणजे १७ व्या लोकसभेतसुद्धा वयाची सत्तरी ओलांडलेल्या खासदारांची संख्या तब्बल १५४ आहे. तरुणांचा देश म्हटल्या जाणा-या भारताच्या सार्वभौम सभागृहात तरुणांचे प्रमाण अत्यल्प असावे हा लोकशाहीतील सन्मान संधीच्या तत्त्वांचा अपमान नव्हे काय? जे युवक देशाचे आधारस्तंभ मानले जातात, ज्यांच्याकडे पाहून देशाच्या भवितव्याविषयी अपेक्षा ठेवल्या जातात त्या तरुणांची चेष्टा व मस्करी करण्याचाच हा प्रकार नव्हे काय? खरे तर इतकी मोठी युवाशक्ती असताना तिला देश किंवा राज्यकारभाराच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान मिळणे, अनेक महत्त्वाच्या निर्णयप्रक्रियांमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते-केले गेले. ही स्थिती बदलण्याची खरी गरज आहे. भारत ही लोकशाहीची जननी आहे असेही म्हटले जाते.मग लोकशाहीच्या जननीची युवा पिढी निवडणुकांसाठी अपात्र का मानली जाते? जागतिक स्तरावर लोकशाहीवादी देशांमध्ये अनेक मोठे लोक आपल्या युवावस्थेमध्ये राजकारणात आले, यशस्वी झाले नि वयाच्या साठी-सत्तरीनंतर निवृत्तही झाले. मात्र भारतात असे का होत नाही? असो. भारताला जगात मोठे व्हायचे असेल तर तरुणांना मोठे स्थान द्यावे लागेल. अर्थात ही प्रक्रिया काही प्रमाणात आता सुरू झाल्यासारखी दिसते परंतु त्याचे प्रमाण अपेक्षेइतके नाही ही वस्तुस्थिती आहे. पिढ्यानुपिढ्या राजकारण नावाचा धंदा करण्याची आणि आपली घराणी शाबूत ठेवण्याचा दुर्दैवी प्रकार आपल्या देशात घडला आणि तो 'लोकशाही' या गोंडस नावाखाली सातत्याने होत राहिला ही त्यातील सर्वांत मोठी शोकान्तिका म्हणावी लागेल. तरुणांमधल्या जिद्दीला, चिकाटीला अथवा आव्हाने पेलण्याच्या क्षमतेलाच राजकारणात रोखले गेले किंवा त्यांचे खच्चीकरण केले गेले. या देशाचा इतिहास, भूगोल, संस्कृती, परंपरागत चालीरीती, समाजव्यवस्था टिकून राहावी, काळानुरूप तिचे संवर्धन व्हावे, असे वाटत असेल तर युवाशक्ती आणि महिलाशक्तीला दुर्लक्षून चालणार नाही. निर्णयप्रक्रियेत त्यांची मदत घ्यावीच लागेल.

# आमच्या नेत्यांकडे रेल्वे तिकीटासाठीही पैसे नाहीत



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकांची सर्व पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेसनेही तयारी सुरू केली आहे. काही दिवसापूर्वी काँग्रेसच्या बँक खात्यांवर कारवाई झाली असून काँग्रेसची खाती गोठवली आहेत. याबाबत आज काँग्रेसने दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले आहेत. या निवडणुकीत आम्ही प्रचारही करु शकत नाही, आमचे नेते प्रवासही करु शकत नाहीत. रेल्वे तिकीटासाठीही पैसे नाहीत, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.आज दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, अजय माकन उपस्थित होते. यावेळी बोलताना राहुल गांधी म्हणाले, विना बँक खाते आम्ही निवडणूक कशी लढणार, जर तुमच बँक खाते बंद केले, एटीएम बंद केले तर तुम्ही जगणार कसे? आम्ही ना प्रचार करु शकतो, ना प्रवास करु शकतो, ना नेत्यांना पैसा देऊ शकतो, असेही राहुल गांधी म्हणाले.काँग्रेसला निवडणूक लढवू द्यायची नाही निवडणुकीच्या दोन महिने आधी काँग्रेसच्या बँक खात्यावर कारवाई करणे म्हणजे काँग्रेसला निवडणूक लढवूच द्यायची नाही, एक महिन्यापूर्वी काँग्रेसची सर्व खाती फ्रीज केली आहेत. काँग्रेससोबतच अन्याय सुरू आहे. निवडणूक आयोग यावर शांत आहे. आम्हाला २० टक्के मतदान करतात, सर्व संस्थात्मक संघटना शांत आहेत असेही राहुल गांधी म्हणाले. देशात लोकशाही नाही देशात लोकशाही आहे हे खोटे आहे, आमची बँक खाती गोठवली नाही तर लोकशाही गोठवली आहे. सात वर्षां आधी १४ लाखांचा मुद्दा आहे, १० हजार रुपयांचा दंड असायला हवा होता आज ते २०० कोटी वसूल करत आहेत असेही राहुल गांधी म्हणाले.

# केजरीवालांच्या अटकेला स्थगिती नाही

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मद्य धोरण प्रकरणात मनी लॉंडिंग घोटाळा आरोपात दिल्ली हायकोर्टाने सीएम केजरीवाल यांच्या याचिकेवर दोन आठवड्यात जबाब देण्यास सांगितले आहे. दिल्ली हायकोर्टात पुढची सुनावणी २२ एप्रिल रोजी होणार आहे.आज मद्य धोरण प्रकरणात दिल्ली हायकोर्टात सुनावणी झाली. आज ईडीने कोर्टात कागदपत्रे जमा केली. ईडीकडून अतिरिक्त सॉलिसीटर एस व्ही राजू यांनी कोर्टात कागदपत्रे जमा केली, आणि म्हटले की, आम्ही कोर्टाच्या सांगण्यावरुन कागदपत्रे देत आहोत, याचिकाकर्ते याची मागणी करु नका. सीएम केजरीवाल यांनी ईडीविरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली.



केजरीवाल यांच्याकडून वकील अभिषेक सिंघवी उपस्थित होते, सिंघवी म्हणाले, लोकसभा निवडणुकीनंतर अटक करा, निवडणुका तरी लढवण्यासाठी वेळ द्या. तुम्हाला एवढेच समाधान मिळणार असेल तर जूनमध्ये अटक करा. कमीत कमी निवडणुका लढवण्यापर्यंत दंडात्मक कारवाईपासून सुरक्षा मिळाली पाहिजे, मला निवडणूक लढायला द्यायला पाहिजे, असेही केजरीवाल यांच्याकडून वकील सिंघवी म्हणाले.ईडीकडून आठवेळा समन्स दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणी ईडीने आता पर्यंत आठवेळा समन्स पाठविण्यात आले आहेत. केजरीवाल अजूनही चौकशीसाठी हजर झालेले नाही. दरम्यान, आपकडून ईडीवर आरोप केले आहेत. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडी अटक करण्यात येणार असल्याचा आरोप आपने केला आहे.

# इंटरनेट एकदम सुसाट, ९० चित्रपट डाऊनलोड करा १ मिनिटांत



शांघाय : चीनचा इंटरनेट क्षेत्रात दबदबा आहे. जगातील सर्वात वेगवान इंटरनेट सेवा पुरविण्याचा दावा चीन करत आहे. हे एक क्लाऊड ब्रॉडबँड आहे. ते रॉकेटच्या गतीने ग्राहकांना इंटरनेट सेवा देते. चीनच्या दाव्यानुसार, क्लाऊड ब्रॉडबँड तंत्रज्ञानाच्या मदतीने युझर्स एका मिनिटांमध्ये जवळपास ९० चित्रपट सहज डाऊनलोड करु शकतील. या इंटरनेट सेवेला एंहेस्ड ऑल-ऑप्टिकल नेटवर्क असे नाव देण्यात आले आहे. चीनच्या या नव तंत्रज्ञानामुळे इतर देशांच्या भुवया उंचावल्या आहेत.जगातील पहिल्या १०जी क्लाऊड ब्रॉड बँड कम्युनिटीची शांघायमध्ये सुरुवात करण्यात आली आहे. या सेवेला अर्थातच '५०जी-पीओएन'चे पाठबळ आहे. चायना टेलिकॉम शांघाय कंपनी आणि यंगपू जिल्हा प्रशासनात या सेवेसाठी करार झाला आहे. यामध्ये लायटिंग फास्ट इंटरनेट स्पीड देण्यात येते. त्यामुळे ग्राहकांचा डिजिटल अनुभव वृद्धींगत झाला आहे. त्यांना इंटरनेटचा खरा आनंद लुटता येत आहे.यामध्ये युझर्सला १० गीगाबाईट क्लाऊड ब्रॉडबँडचा अनुभव मिळेल. चीनच्या अल्ट्रा फास्ट डेटा हस्तांतरण तंत्रज्ञानामुळे इतर अनेक नवसंशोधनाला बळ मिळेल. तर सध्या ज्या स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. ज्यात स्मार्ट होम तंत्रज्ञानाचा वापर होतो, ते अद्ययावत होईल.या तंत्रज्ञानाच्या मदतीने रिअल टाईम डेटा प्रक्रिया, लॅग फ्री कम्युनिकेशनसह १०-जी नेटवर्क मिळेल. भारतातही ५-जी नेटवर्क नंतर सॅटेलाईट इंटरनेटची चर्चा सुरु आहे. पण चीनने मात्र आघाडी घेतली आहे. भारतात आता ६-जीची चर्चा रंगत आहे. पण त्याविषयी कोणतेही धोरण स्पष्ट झालेले नाही.

# काँग्रेसचे उमेदवार निश्चित मात्र, मित्र पक्षांच्या चर्चेनंतर आघाडीच्या जागांमध्ये बदल होण्याची शक्यता : नाना पटोले

मुंबई; महाविकास आघाडीची जागा वाटपावर चर्चा झाली असून वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकपा या मित्रपक्षांशी बोलणी झालेली आहे. वंचितसोबतही आजही चर्चा झाली आहे. काँग्रेस पक्षाचे उमेदवारही जवळपास निश्चित झाले आहेत. सर्व मित्र पक्षांशी चर्चा करून महाविकास आघाडीचे जागावाटप आणि उमेदवार दोन तीन दिवसात जाहीर होतील, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे.टिळक भवनमध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी आज सकाळी चर्चा झाली. या चर्चेत काँग्रेसकडून मी तर शिवसेनेकडून खासदार संजय राऊत उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलणी केली. जागा वाटपाबरोबर प्रचार सभा व इतर मुद्द्यांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. राज्यातील सर्व ४८ जागा महाविकास आघाडीत लढवत आहे. आघाडीतील सर्व मित्रांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेनंतर काही जागांची अदलाबदल होऊ शकते आणि याबाबतचा निर्णय दोन दिवसात होईल.भारतीय जनता पक्षाने मागील १० वर्षात देश बरबाद केला आहे. लोकशाही, संविधानाला न जुमानता मनमानी कारभार केला आहे. महाविकास आघाडी मजबूत करून भाजपाच्या या अत्याचारी सरकारला सत्तेतून खाली खेचणे हेच लक्ष्य आहे. राहुल गांधी यांनी ज्या शक्तीचा उल्लेख केला त्या आसुरी शक्तीविरोधात काँग्रेसचा लढा आहे. परंतु भाजपाकडे मुद्देच नसल्याने त्यांनी शक्ती शब्दाचा विपर्यास केला आहे. मणिपूरमध्ये महिलांवर अत्याचार होत असताना, देशभरात महिला अत्याचार होत असताना भाजपा व मोदींना नारी शक्तीची आठवण का झाली नाही आजच नारी शक्ती कशी आठवली? गुजरातमध्ये एकाच टप्प्यात मतदान होत आहे, महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान घेण्याची काही गरज नव्हती परंतु भारतीय जनता पक्ष घाबरलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान घेतले जात आहे.

# भारतातील १ टक्के नागरिकांकडे ४० टक्के संपत्ती

नवी दिल्ली : भारतीय लोकांची संपत्ती दिवसेंदिवस वाढत असली तरी मोठ्या प्रमाणात असमानता देखील वाढत आहे. श्रीमंत अधिकच श्रीमंत होत आहे तर गरिब अधिकच गरिब होत असल्याचे चित्र सध्या देशात दिसत आहे. देशातील आर्थिक असमानतेबाबतचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये याबाबतची माहिती देण्यात आली. यामध्ये दिलेल्या माहितीनुसार देशातील फक्त १ टक्के लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती आहे. म्हणजे उपरलेल्या ९९ टक्के लोकसंख्येकडे ६० टक्केच संपत्ती आहे.सन २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तिंच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. भारतात आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसून येत असून देशातील १ टक्के लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती असल्याचे अहवालातून समोर आले आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसार २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तिंच्या संपत्तीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढली. २०२२-२३ मध्ये देशातील १ टक्के लोकसंख्येच्या संपत्तीत २२.६ टक्क्यांची वाढ झाली. दरम्यान, आर्थिक बिषमतेसंदर्भातील अहवाल थॉमस पिकेट्टी (पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स), लुकास चॅन्सेल (हार्वर्ड केनेडी स्कूल) आणि नितीन कुमार भारती (न्यूयॉर्क विद्यापीठ) यांनी तयार केला आहे.पैसा विशिष्ट लोकांकडेच देशातील पैसा विशिष्ट लोकांकडेच जात आहे. त्यामुळे दिवसेंदिवस देशातील आर्थिक विषमता वाढत आहे. २०१४-१५ ते २०२२-२३ या काळात देशातील अब्जाधिशांच्या संपत्तीत लक्षणीय वाढ झाली. त्याचा परिणाम म्हणून देशात गरिब श्रीमंत यांच्यातील दरी वाढली आहे. देशातील फक्त १ टक्के लोकसंख्येकडे सर्वांत जास्त हिस्सेदारी आहे. दरम्यान, भारतातील आर्थिक असमानतेवरील अहवालात म्हटले आहे की, देशातील अतिश्रीमंत लोकांवर सुमारे २ टक्के अतिरिक्त कर लादला जावा. तसेच आरोग्य, शिक्षण आणि पोषण यावर गुंतवणूक वाढवली पाहिजे अशी माहिती या अहवालात देण्यात आली आहे. श्रीमंतांच्या संपत्तीत २२ टक्क्यांनी वाढ आर्थिक विषमता अहवालात दिलेल्या माहितीनुसार २००० सालापासून श्रीमंताच्या संपत्तीत वेगाने वाढ होत गेली. तिथूनच गरिब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढ गेल्याचे म्हटले आहे. १९२२ मध्ये देशातील १ टक्के श्रीमंत लोकसंख्येकडे १३ टक्के संपत्ती होती. मात्र, त्यानंतरच्या काळात २०२२-२३ मध्ये देशातील १ टक्के लोकसंख्येच्या संपत्तीत २२.६ टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती या अहवालात सांगण्यात आली आहे. या १ टक्के श्रीमंत लोकसंख्येकडे देशातील ४० टक्के संपत्ती एकवटली आहे. यावरुन आर्थिक विषमता किती आहे हे दिसून येते.



# विकसित भारतचे संदेश बंद करा

नवी दिल्ली : लोकांना व्हॉट्सॲपवरुन 'विकसित भारत' नामक जाहिरातीतून मोदींची गॅरंटी आणि मोदींनी केलेल्या कामाची माहिती पोहोचवली जात आहे. सध्या आचारसंहिता लागू झालेली आहे, तरीही व्हॉट्सॲपवर सरकारी जाहिराती येत असल्याने याबाबतच्या अनेक तक्रारी निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे आयोगाने या जाहिराती व्हॉट्सॲपवरुन पाठवणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत.निवडणूक आयोगाने गुरुवारी सांगितले की, आयोगाने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला निर्देश दिले आहेत की, जनतेच्या व्हॉट्सॲपवर पाठवण्यात येणारे विकसित भारतचे मेसेज तातडीने थांबविण्यात यावेत. तसेच आयोगाने आयटी मंत्रालयाकडून या प्रकरणाचा अनुपालन अहवालही मागवला आहे. दरम्यान, आयोगाने सांगितले की, याबाबत आमच्याकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामध्ये त्यांनी म्हटले की, सध्या देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झालेली असतानाही लोकांच्या फोनवर सरकारी जाहिरातीत पाठवल्या जात आहेत.मॅसेज आचारसंहितेपूर्वीचे? निवडणूक आयोगाच्या आदेशाला उत्तर देताना आयटी मंत्रालयाने सांगितले की या जाहिरातीसंबंधीचे पत्र आणि मेसेज आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पाठवण्यात आले होते. पण लोकांच्या मोबाईलला कदाचित व्यवस्थित नेटवर्क येत नसल्याने हे मेसेज उशीरा रिसिव्ह झाले असतील.




# जागतिक वन दिनी जिल्हाधिकारी रमल्या फुलांच्या-पक्षांच्या सान्निध्यात !



लातूर, दि. २१ : जागतिक वन दिनानिमित्त वन विभागाने आयोजित केलेल्या वन सफरीत सहभागी होत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे फुलांच्या, पक्षांच्या सान्निध्यात रमून गेल्या. यावेळी त्यांनी तीन तास वन सफर करीत साखरा उद्यानातील वृक्ष, पक्षी यांची माहिती जाणून घेतली. सहायक वनसंरक्षक वृषाली तांबे, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, वनपरीमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, जैवविविधता समिती सदस्य शहाजी पवार, पक्षीमित्र राहुल जवळगे यावेळी उपस्थित होते.लातूर जिल्ह्यातील या जैवविविधतेचे जतन संवर्धन करण्याबाबत त्यांनी वनाधिकारी व जैवविविधता समिती सदस्यांशी जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी मनमोकळा संवाद साधला. सर्वसाधारणपणे पक्षी व वन्यजीवांच्या निरीक्षणासाठी सूर्योदयाची वेळ योग्य असते, हे जाणून जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे ह्या सकाळीच साखरा उद्यानात दाखल झाल्या. यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. साखरा व अंकोली येथील वनक्षेत्राची जिल्हाधिकारी यांनी पहाणी केली. माळरानावरील जैवविविधता, विविध वन्यप्राण्यांच्या पावलांचे ठसे त्यांनी पाहीले.वन्यजीवांसाठी तयार करण्यात आलेले कृत्रीम पाणवठे, तसेच शिकारी पक्षाच्या प्रजातीबाबत माहिती त्यांनी जाणून घेतली. वनपरीक्षेत्रात लावण्यात आलेली झाडे उन्हाळ्यातही जगावीत यासाठी त्यांनी पाण्याचे नियोजन करण्याच्या सूचना केल्या. यासाठी लोकसहभाग वाढवण्यातबाबत पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. साखरा येथील बटर फ्लाय गार्डन तसेच घनवनात असलेले विविध पक्षी व फुलझाडे यांची पाहणी केली. जिल्ह्यातील नैसर्गिक संपत्ती जपण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. वन संरक्षणासाठी योगदाने देणारे वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, सूर्यकांत घोगरे यांचे जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केले.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सीव्हिजिल ॲपवर तक्रार करा


लातूर :- भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन प विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल प विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

हा सीव्हिजिल प अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त प उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. प वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे. वैशिष्ट्य सीव्हिजिल प हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहिताच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

वापर कसा करायचा

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या पमध्ये जावून सीव्हिजिल सर्च करावे.त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करून खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.



अचूक कृती व देखरेख

या प्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल प जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

लाईव्ह फोटो, व्हिडिओ

या पच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हिडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

तातडीने होते कारवाई

या पवर तक्रार दाखल होताच भारत निवडणूक आयोग तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कार्रवाई करेल.

डाटा सुरक्षा

या पवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# डॉ. कल्याण बरमदे यांची अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड

लातूर : येथील ख्यातनाम स्त्री रोग तज्ज्ञ तथा वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांची वाराणसी येथे नुकत्याच पार पडलेल्या अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या वार्षिक परिषदेत संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या वाराणसी येथे पार पडलेल्या वार्षिक परिषदेस देशभरातील सहाशेहून अधिक तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. यावेळी संघटनेची वर्ष २०२४-२५ ची कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. अतुल गणात्रा, उपाध्यक्ष डॉ. कल्याण बरमदे यांची तर सचिव म्हणून डॉ. सुधा टंडन यांची निवड करण्यात आली. अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटना ही भारतातील लॅप्रोस्कोपिक म्हणजे बिन टाक्याने होणाऱ्या शस्त्रक्रिया म्हणजे गर्भ पिशवीचे आजार, गर्भ पिशवी गाठ काढणे, गर्भ वाहक नलिकेचे आजार, गर्भ वाहक अंडकोश आजाराच्या शस्त्रक्रियेविषयी मार्गदर्शन करण्याचे काम करते. देशपातळीवर स्त्री विषयक आरोग्य क्षेत्रात काम करणारी ही एक अग्रगण्य संघटना आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अ. भा. स्त्री रोग संघटना फॉगसी चे अध्यक्ष डॉ. जयदीप टँक, भारतीय टेस्ट ट्यूब बेबी चे अध्यक्ष डॉ. अमित पत्की, माजी अध्यक्ष डॉ. पंडित पळसकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या परिषदेत सायंटिफिक लेक्चर, परिचर्चा, संवाद व लाईव्ह डेमोनस्ट्रेशन करण्यात आले. यामध्ये गर्भ पिशवीचे आजार यावरील चर्चासत्रात डॉ. कल्याण बरमदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच लाईव्ह सर्जरीमध्ये त्यांनी डेमोनस्ट्रेशनही करून दाखवले.






डॉ. कल्याण बरमदे यांच्या या निवडीबद्दल लातूर आयएमए चे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. आशिष चेपूरे, आयएमए सदस्य डॉ. अजय जाधव, डॉ. संजय पौळ, डॉ. रमेश भराटे, डॉ. अजय पुनपाळे, स्त्री रोग संघटनेच्या डॉ. मेघना गुगळे, डॉ. अनिल वलसे, डॉ. संदीपान साबदे, डॉ. वर्धमान उदगीरकर, डॉ. चंद्रशेखर आष्टेकर, डॉ. सुधाकर सुडे, डॉ. प्रताप पन्हाळे आदीनी त्यांचे कौतुक केले आहे.

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक, आज कोर्टात हजर करणार

आज राष्ट्रीय राजकारणात एक मोठी घटना घडली आहे. दिल्ली मद्य धोरणातील कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज (२१ मार्च) अटक करण्यात आली आहे.

सायंकाळीच एऊ चे पथक केजरीवालांनी निवासस्थानी दाखल झाले होते. यावेळी त्यांची चौकशी आणि घराची झाडाझडतीही घेण्यात आली. दोन तासांच्या चौकशीनंतर ईडीने केजरीवालांना ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील मद्य घोटाळ्याप्रकरणी ईडीने केजरीवालांना आतापर्यंत चौकशीसाठी नऊ समन्स बजावले, मात्र ते एकदाही हजर झाले नाही. अटकेपासून दिलासा मिळण्यासाठी केजरीवालांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती, पण न्यायालयानेही त्यांना दिलासा देण्यास नकार दिला. त्यानंतर आज अचानक ईडीचे पथक केजरीवालांच्या घरी दाखल झाले. यावेळी केजरीवालांची त्यांच्या घरात दोन तास चौकशी झाली आणि चौकशीनंतर ईडीची टीम केजरीवालांना ताब्यात घेतले. उद्या त्यांना कोर्टात हजर केले जाणार आहे.

'केजरीवाल राजीनामा देणार नाहीत'

अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर आम आदमी पार्टीने स्पष्ट केले आहे की ते (केजरीवाल) मुख्यमंत्रिपदावर कायम राहतील, ते राजीनामा देणार नाही. मंत्री आतिशी म्हणाल्या की, केजरीवाल मुख्यमंत्री होते, आहेत आणि राहतील.

# सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे -सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रशासनाने जय्यत तयारी केली असून आज तहसिल कार्यालयात विविध विभागाच्या बैठका घेण्यात आल्या. राजकीय पक्ष, माध्यम प्रतिनिधी, पोलिस पाटील ,स्वीप जनजागृती, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती यांच्यासह विविध स्तरावर बैठकी आज सुरू होत्या. आता सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे असे आवाहन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले. तहसिल कार्यालयामध्ये आज सर्वप्रथम राजकीय पक्ष पदाधिकारी व माध्यम प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. भारत निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहितेच्या अंमलबजावणी पासून तर निवडणूक संपेपर्यंतच्या कार्यक्रमाबाबतची माहिती राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना देण्यात आली. याशिवाय विधानसभा मतदार संघातील मतदारांची संख्या पोस्टल वोटिंग कशा पद्धतीने होईल, केंद्रांची माहिती, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट बद्दल शंका समाधान आणि मतदान करताना मतदानाच्या दिवशी राजकीय पक्षांनी घ्यावयाची काळजी या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीला १५ हिगोली लोकसभा मतदार संघाच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना यांच्यासह तहसिलदार शारदा चौंडेकर (किनवट) व किशोर यादव (माहूर) , मुख्याधिकारी मुंगाजी काकडे , नायब तहसिलदार विकास राठोड , शेख एन.ए. अनिता कोलगणे , गट विकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव , गट शिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी यावेळी अनेक शंकांचे समाधान करून घेतले. १५- हिंगोली लोकसभा मतदार संघात येणाऱ्या ८३- किनवट विधानसभा मतदार संघातील राजकीय पक्षांचे व माध्यम प्रतिनिधींचे आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये प्रशासनाला उत्तम सहकार्य लाभले असून सर्व समित्या कार्यान्वित झाल्या असून कोणत्याही माहितीसाठी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी सहायक जिल्हाधिकाऱ्यांनी केले. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना यादरम्यान




कोणतीही माहिती लागल्यास एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या एक खिडकी कक्ष अंतर्गत उमेदवारांना वाहन परवाने झेंडे, पताके,चित्ररथ, मोबाईल व्हॅन,चौक सभा, जाहीर सभा, रॅली,उमेदवारांचे तात्पुरते प्रचार कार्यालय, हेलीपॅडचे अक्षांश रेखांश तसेच माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्षाकडून एसएमएस, ऑडिओ आणि व्हिडिओ व इतर प्रचार साहित्य परवानग्या देण्यासाठी या ठिकाणी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रशिक्षण व्यवस्थापन कक्षाचे व माध्यम कक्षाचे सहायक मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे यांनी आदर्श आचार संहिता व मीडिया प्रतिनिधींना प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण व्यवस्थापन कक्षाचे सहाय्यक अव्वल कारकून रामेश्वर मुंडे , मंडळ अधिकारी एम. डी. वांगीकर , मास्टर ट्रेनर एम. बी. स्वामी , तलाठी सचिन भालेराव , एम.के. सांगवीकर , निवडणूक विभागाचे महसूल सहाय्यक नितीन शिंदे , कर्मचारी व्यवस्थापन कक्षाचे संदीप पाटील आदींनी प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. दुपारच्या सत्रात किनवट-माहूर तालुक्यातील सर्व पोलीस पाटील व विविध कक्षाचे प्रमुख व सहाय्यक अधिकारी-कर्मचारी यांची बैठक तहसीलदार शारदा चोंडीकर ,मुख्याधिकारी मुंगाजी काकडे , नायब तहसीलदार विकास राठोड व अनिता कोलगणे यांनी घेतली.

# व्याजमाफीची सवलत आता फक्त दहा दिवस शहरातील नागरिकांनी लाभ घ्यावा - मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी: थकित मालमत्ता करा वरील व्याज माफ करण्याचा निर्णय मनपाने जाहीर केलेला असून ही सवलत दि.३१ मार्च २०२४ पर्यंतच लागू राहणार आहे.पुढील केवळ १० दिवसच व्याजमाफीची सवलत मिळणार असून लातूर शहरातील नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.



शहरातील मालमत्ताधारकांना कर भरणे सोयीचे व्हावे यासाठी थकीत करावरील व्याज मनपाकडून माफ करण्यात येणार आहे. महानगरपालिकेने ही योजना जाहीर केल्यानंतर शहरातील अनेक मालमत्ताधारक महानगरपालिकेत येऊन कराचा भरणा करत आहेत.उर्वरित मालमत्ता धारकांनीही आगामी दहा दिवसात आपल्याकडील थकबाकी व चालू बाकीचा भरणा करून सवलत योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

विशेषत: एमआयडीसी व कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यावसायिकांकडे थकीत असणाऱ्या कराचे प्रमाण अधिक आहे.त्यांच्यासाठी ही योजना अधिक फायदेशीर आहे.जे मालमत्ताधारक मालमत्ता कर भरणार नाहीत त्यांच्या मालमत्ता सील,जप्ती करण्याची कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेऊन व्याजमाफी मिळवावी,असे आवाहनही मनपाकडून करण्यात आले आहे. महानगरपालिकेने दि.१२ मार्च रोजी ही सवलत योजना जाहीर करण्यापूर्वी अनेकांनी मालमत्ता कराचा व्याजासह भरणा केलेला आहे.दि.१ जानेवारी २०२४ ते १२ मार्च २०२४ या कालावधीत ज्या मालमत्ताधारकांनी व्याजासह कराचा भरणा केलेला आहे त्यांनाही या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.व्याज सवलतीची जी रक्कम मनपाकडे जमा राहील ती रक्कम पुढील वर्षाच्या मूळ मालमत्ता करामध्ये समायोजित केली जाईल, असे मनपाकडून कळविण्यात येत आहे.

# किनवट नगर परिषद च्या पाणी पुरवठा रुमला ठोकले सिल पाणीपट्टी कर न भरल्यामुळे पाटबंधारे विभागाची कारवाई

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) बिगर सिंचन पाणीपट्टीकर भरु न शकलेल्या किनवट नगर परिषदेच्या पाणी पुरवठा करणार् एक्सया रुमला अखेर २० मार्च मुदत देऊनही कर भरणा न केल्यामुळे पाटबंधारे विभागाच्या नागझरी जलाशयाचे शाखा अभियंता गायकवाड यांनी सिल ठोकल्यानंतर नगर परिषद प्रशासनाची झोप उडालेली दिसत नाही. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागणार की, गल्लीबोळ, मोहल्यापर्यंत टँकरद्वारा पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करणार? हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. करोडोंची उलथापालथ करणारी नगर परिषद या थकीत रकमेचा भरणा करण्यासाठी किती काळ लावणार? याकडे आता किनवटकरांचे लक्ष वेधने स्वाभाविक म्हणता येईल. थकीत कराच्या ४० लाख ९६ हजार रकमेपेक्षाही करारनाम्याच्या वैधतेचा मुद्दा तेवढाच महत्वाचा असणार आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये करारनाम्याची मुदत संपुष्टात आली आहे. तरी सुद्धा नगर परिषद प्रशासनाला वेळीच जाग आलेली दिसत नाही. नगराध्यक्ष व नगरसेवकांची सत्ता असती तर हा ठपका त्यांच्यावर बसला प्रशासकांच्या असता. काम काजाचा अनुभव आता किनवटकरांना पहायला मिळाला. नव्याने मुख्याधिकारीपदाची सुत्रे स्विकारलेले मुंगाजी काकडे यांचे याकामी अक्षम्य दुर्लक्ष दिसते. २०२४ मार्च अखेरपर्यंत थकीत भरणा न केल्यास २० मार्च पासून किनवट शहराला केला जाणारा नागझरी जलाशयातील पाणी पुरवठा बंद करण्याचा रोखठोक इशारा पाटबंधारे प्रशासनाने दिला होता. तरीही त्याचे प्रशासनाला गांभीर्य वाटले नाही. पाणी पुरवठा करण्यासाठी टँकरचा बापर करणार? त्याच्या खर्चाचा अधिभार तिजोरीवर पडणार की नाही? याची जिम्मेदारी संबंधितांवर सोपवली पाहिजे. किनवट स्थित पाटबंधारे उपविभागाने देखिल नगर परिषद प्रशासनाकडे पाठपुरावा तर केलाच शेवटी सिल ठोकण्यापुर्वी सुद्धा कल्पना दिले मात्र त्यांना घाम आलेला दिसत नाही. म्हणून थकबाकीच्या वसुलीसाठी पाटबंधारे विभागाचे नागझरी जलाशयाचे शाखा अभियंता गायकवाडांनी कार्यालयीन पथकाला सोबत घेऊन अखेर २० मार्च सकाळी सिल ठोकले. नांदेड पाटबंधारे (उत्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता सी. आर. बनसोड यांच्या आदेशावरून सदरची कार्यवाही करून अहवाल पाठवला आहे. आता किती काळ लावणार हा थकीत भरणा करण्यासाठी ? असा लोकांचा सवाल आहे. खरे तर कर्तव्यकसूर करणाऱ्यांवर कार्यवाही व्हायलाच पाहिजे अशा संतप्त प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांतून ऐकायला मिळत आहे.



# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रेणुका देवी मंदिरात महाआरती व सुभानी दर्गा येथे चादर चढवून अभिष्टचिंतन







लातुर प्रतिनिधी-२१ मार्च २०२४ महाराष्ट्र राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दि.२१ मार्च २०२४ रोजी रेणापूर शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने रेणापूर येथील ग्रामदैवत रेणुका देवी मंदिरात सकाळी महाआरती व शहरातील महेबुब सुभानी दर्गा येथे चादर चढवून अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी रेणापूर कॉंग्रेस तालुका अध्यक्ष ड. प्रमोद जाधव रेणापूर शहराध्यक्ष मतीन अली सय्यद, सभापती उमाकांत खलंग्रे,उपसभापती शेषेराव हाके,हणमंत पवार,बाजार समिती संचालक जनार्दन माने,बाळकृष्ण खटाळ,विश्वनाथ कागले,सौ.पुजा इगे, स्वाती सोमाणी,निर्मलाताई गायकवाड,राजाभाऊ सांळुके, अल्पसंख्यांक शहरअध्यक्ष पाशाभाई शेख, खमरुद्दीन शेख,अकबर खुरेशी,नय्युम आत्तर,सय्यद मुजफ्फर,गौस फरीद,आयुब शेख,पदम पाटील,अनिल पवार,रामलिंग जोगदंड,ॲड.प्रशांत अकनगिरे,सचिन पुंडलिकराव इगे,उमेश सोमाणी,अजय चक्रे, विजयकुमार एकुरके,मुकेश राजे,हकीमभाई सय्यद,राजभाऊ शिंदे,दिपक पाटील,दिनेश पाटील,रंगनाथ इरळे,अतुल गोकळे,प्रदिप काळे,शहाजी कुरे, प्रा.सिदार्थ चव्हाण यांच्यासह रेणापूर तालुका व शहर कॉग्रेस कमिटी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE